## NASHIK MUNICIPAL CORPORATION, NASHIK

**E-Tender Cell Department**

**E-Tender Notice No.22 (2025-26)**

Nashik Municipal Corporation, Nashik (Town Planning Department) vide E-Tender Notice No.22 (Year 2025-26) invites bids for 01 number of works which will be displayed on the website www.mahatenders.gov.in. from dt. 04/11/2025 to 11/11/2025 up to 3.00 pm. Last date for acceptance of tender will be dt. 11/11/2025.

**Note -** All further necessary notices/clarifications will be published on the online website.

**Sd/-**
**Executive Engineer**
**(Tender Cell)**
**Nashik Municipal Corporation**

जनसंपर्क/जा.क्र/३२०/२०२५ दि.३/११/२०२५ गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.

## BHARTI HEXACOM LIMITED

**CIN: L74899HR1995PLC132187**
**Registered Office: Airtel Center, Plot No.16, Udyog Vihar, Phase - IV, Gurugram - 122015, India**
**Corporate Office: Bharti Crescent, 1, Nelson Mandela Road, Vasant Kunj, Phase-II, New Delhi - 110070, India**
**Tel.: +91-124-4222222; Fax: +91-124-4248063**
**Email: bhartihexacom@bharti.in, Website: www.bhartihexacom.in**

### Audited Financial Results for the second quarter ended September 30, 2025

In compliance of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Board of Directors of Bharti Hexacom Limited (the 'Company') in its meeting held on Monday, November 03, 2025, approved the Audited Financial Results for the second quarter ended September 30, 2025 ('Financial Results').

The detailed Financial Results along with the auditor's reports thereon, are available on the website of the Company at **https://www.bhartihexacom.in/results-quarterly-results.html** and on the website of stock exchanges i.e. National Stock Exchange of India Limited and BSE Limited at **www.nseindia.com** and **www.bseindia.com**, respectively. The Financial Results and auditor's reports can also be accessed by scanning the given QR Code.

For and on behalf of
**Bharti Hexacom Limited**
Sd/-
**Amit Chaturvedi**
**Company Secretary & Compliance Officer**

**Date :** November 03, 2025
**Place :** New Delhi

## pnb MetLife

*Milkar life aage badhaein*

**PNB MetLife India Insurance Company Limited: Newspaper Publication**
Registration Number: 117 dated August 6, 2001 with IRDAI
(Regulation 52 (8) read with regulation 52 (4) of the Listing Regulations)

**(₹ in Lakhs)**

| Sr. No. | Particulars | Quarter ending September 30, 2025 | Half year ending September 30, 2025 | Quarter ending September 30, 2024 |
|---|---|---|---|---|
| 1 | Premium Income (Gross) (Refer note (c)) | 3,23,211 | 5,47,541 | 2,62,570 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 3,502 | 15,597 | 5,624 |
| 3 | Net Profit/ (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) (Refer note (e)) | 3,502 | 15,597 | 5,624 |
| 4 | Net Profit/ (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 3,629 | 15,597 | 5,913 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | NA | NA | NA |
| 6 | Equity Share Capital (as at date) | 2,04,947 | 2,04,947 | 2,01,288 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet (Refer note (f)) | 46,087 | 46,087 | - |
| 8 | Earning per share (Face value of ₹ 10 each)<br>a. Basic (Not annualized for three months and six months) (in ₹)<br>b. Diluted (Not annualized for three months and six months) (in ₹) | <br>0.18<br>0.18 | <br>0.77<br>0.77 | <br>0.29<br>0.29 |
| 9 | Debt-equity ratio (no. of times) | 0.16 | 0.16 | 0.22 |
| 10 | Debt service coverage ratio (no. of times) | 5.28 | 10.58 | 7.87 |
| 11 | Interest service coverage ratio (no. of times) | 5.28 | 10.58 | 7.87 |

a) This format is modified to reflect the terminology used in the Insurance Act IRDAI Regulations.
b) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015.The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange and the Company's website 'https://www.pnbmetlife.com'.
c) Premium income is gross of reinsurance and net of GST.
d) Line Item No. 5 would be disclosed when Ind AS become applicable to Insurance companies.
e) Net Profit/(Loss) before tax, for the period is Profit/(Loss) before tax as appearing in Profit and Loss Account (Shareholders' account).
f) Reserves are excluding Revaluation reserve and fair value change account.
g) The Company has issued and allotted 4,000 unsecured, subordinated, listed, rated, redeemable, taxable, non-convertible debentures (NCDs) in the nature of 'Subordinated Debt' in accordance with IRDAI (Other Forms of Capital) Regulations, 2015 of face value of 1,000 thousands (each at par) aggregating to ₹ 4,000,000 thousands through private placement on January 27, 2022.
h) During the period, the Company completed right issue of equity shares. A total of 3,65,85,363 fully paid equity shares were allotted to existing shareholders at a price of ₹ 82 per share (comprising a, face value of ₹ 10/- each and premium of ₹ 72/- per share).
i) "Debt-equity ratio is calculated as Total borrowings divided by Net worth
Net Worth = Share Capital + Free Reserves and Surplus + Credit / (Debit) Fair Value Change Account - Debit Balance in Profit and Loss Account"
j) Debt service coverage ratio is calculated as Profit before interest and tax divided by interest expense together with principal repayments of long term debt during the period.
k) Interest service coverage ratio is calculated as Profit before interest and tax divided by interest expense.
l) #-Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Policyholders' and Shareholders' account in accordance with Ind-AS Rules/ AS Rules, whichever is applicable.

For and on behalf of the Board of Directors
**Sameer Bansal**
Managing Director and CEO
DIN No. 10642045


Place: Mumbai
Date : November 3, 2025

PNB MetLife India Insurance Company Limited, Registered office: Unit No. 701, 702 & 703, 7th Floor, West Wing, Raheja Towers, 26/27 M G Road, Bangalore -560001, Karnataka. IRDA of India Registration number 117 dated August 6, 2001 with IRDAI. (Regulation 52 (8) read with regulation 52 (4) of the Listing Regulations) CI No. U66010KA2001PLC028883. The marks "PNB" and "MetLife" are registered trademarks of Punjab National Bank and Metropolitan Life Insurance Company, respectively. PNB MetLife India Insurance Company Limited is a licensed user of these marks. Call us Toll-free at 1-800-425-6969, Website: www.pnbmetlife.com Email: indiaservice@pnbmetlife.co.in or write to us at 1st Floor, Techniplex-1, Techniplex Complex, Off Veer Savarkar Flyover, Goregaon (West), Mumbai - 400062. AD-NF/2025-26/059.

BARRON'S

Now available exclusively on mint

Get access to the trends shaping the US stock market



Download the app to read now

## NEXT MEDIAWORKS LIMITED

**Regd Office: Unit 701 A, 7th Floor, Tower-2, Indiabulls Finance Centre, Senapati Bapat Marg, Elphinstone Road, Mumbai – 400 013**
**Email ID : investor.communication@radioone.in Website : www.nextmediaworks.com**
**CIN: L22100MH1981PLC024052 Tel No: 022-44104104**

**Statement of unaudited financial results for the quarter and six months ended September 30, 2025**

**(INR in Lacs except Earnings per share data)**

| Particulars | Quarter ended | | | Six months ended | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|
| | September 30, 2025 | June 30, 2025 | September 30, 2024 | September 30, 2025 | September 30, 2024 | March 31, 2025 |
| | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| Revenue from operations | - | - | - | - | - | - |
| Loss before exceptional items and tax | (115) | (117) | (131) | (232) | (262) | (488) |
| Profit/(loss) before tax (after exceptional items) | (115) | (117) | (131) | (232) | (262) | 394 |
| Profit/(loss) after tax (after exceptional items) | (115) | (117) | (131) | (232) | (262) | 394 |
| Total Comprehensive Income/(loss) | (530) | (117) | (131) | (647) | (262) | 324 |
| Paid-up Equity Share Capital (Face Value - INR 10/- per share) | 6,689 | 6,689 | 6,689 | 6,689 | 6,689 | 6,689 |
| Other Equity excluding Revaluation Reserves as per last audited balance sheet | | | | | | (9,188) |
| Earnings/(loss) per share (of INR 10/- each) | Not Annualised | Not Annualised | Not Annualised | Not Annualised | Not Annualised | |
| Basic and Diluted | (0.18) | (0.17) | (0.19) | (0.35) | (0.39) | 0.59 |

Note: Above is an extract of the detailed format of quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financials Results are available on the Stock Exchanges' websites and Company's website:

www.nseindia.com; www.bseindia.com; www.nextmediaworks.com

**Notes**

1 The above un-audited financial results for the quarter and six months ended September 30, 2025 were reviewed and recommended by the Audit Committee and were approved by the Board of Directors at their respective meetings held on November 3, 2025. The Statutory Auditors of the Company have conducted a "Limited Review" of the above results pursuant to Regulation 33 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, "SEBI (LODR)" as amended and have issued an unmodified review conclusion.

2 The financial results have been prepared in accordance with the Indian Accounting Standards ('Ind-AS') prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with Companies (Indian Accounting Standards) Rules as amended from time to time.

3 The company is not required to prepare consolidated financials as per 'Ind AS 110 Consolidated Financial Statements' w.e.f February 7, 2025.

**For and on behalf of the Board of Directors**

**Sameer Singh**
Chairman
DIN: 08138465

Place: New Delhi
Date: November 3, 2025

## bharti — Bharti Airtel Limited — airtel

**CIN: L74899HR1995PLC095967**
**Regd. Office: Airtel Center, Plot no. 16, Udyog Vihar, Phase IV, Gurugram - 122015, India**
**Corporate Office: Bharti Crescent, 1, Nelson Mandela Road, Vasant Kunj, Phase-II, New Delhi - 110070, India**
**T: +91-124-4222222; F: +91-124-4248063**
**Email: compliance.officer@bharti.in, Website: www.airtel.in**

### Audited Financial Results for the second quarter and six months ended September 30, 2025

In compliance of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Board of Directors of Bharti Airtel Limited (the 'Company') in its meeting held on Monday, November 03, 2025, approved the Audited Consolidated and Standalone Financial Results for the second quarter and six months ended September 30, 2025 ('Financial Results').

The detailed Financial Results along with the auditor's reports thereon, are available on the website of the Company at **https://www.airtel.in/about-bharti/equity/results** and on the website of stock exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at **www.bseindia.com** and **www.nseindia.com**, respectively. The Financial Results and auditor's reports can also be accessed by scanning the given QR Code.

For **Bharti Airtel Limited**
**Sd/-**
**Rohit Krishan Puri**
**Joint Company Secretary & Compliance Officer**

**Date :** November 03, 2025
**Place :** New Delhi

## मुंबईमध्ये जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशनचा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा

**मुंबई :** जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशन फेडरेशन 1B - चा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा नुकताच चेंबुर येथील फाईन आर्ट्स ईमारतीतील आर. सी. एफ. सभागृहात संपन्न झाला.फाऊंडेशनच्या सदस्यांनी संगीत, नृत्य आणि हास्य कविता सादर करुन उपस्थितांचे मनोरंजन केले.तदनंतर फेडरेशनचे अध्यक्ष श्री. विश्वामित्र भेरवानी यांनी प्रमुख पाहुणे प्रफुल जोशी (उपाध्यक्ष- वर्ल्ड जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशन), प्रमुख वक्ते पद्मविभूषण डॉ. सुरेश अडवाणी, उपेंद्र मेनन, श्रीम. ललिथा वासन, आनंदराय किणी यांना व्यासपीठावर आमंत्रित करुन दीप प्रज्वलन करण्याची विनंती केली. त्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवर व्यक्तींचा पुष्पगुच्छ देवून त्यांनी स्वागत केले.




# उदंचन जलविद्युत प्रकल्पांचे परवाने जलदगतीने मिळण्यासाठी फास्ट ट्रॅक यंत्रणा - मुख्यमंत्री फडणवीस

## पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आठ हजार कोटींचा सामंजस्य करार

प्रतिनिधी
■ मुंबई

पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत (धुळे/नंदुरबार) प्रकल्पासाठी हरियाणा येथील जीएससी पीएसपी महा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आठ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. राज्य शासनाने उदचंन जलविद्युत प्रकल्पातील गुंतवणूकदारांना जलवापर आणि पर्यावरणीय मंजुरीसह इतर सर्व परवाने जलदगतीने मिळावेत, यासाठी 'फास्ट-ट्रॅक' यंत्रणा उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, जीएससी पीएसपी महा प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सुमित नंदा, संचालक शुभ नंदा, मुख्य विपणन अधिकारी अनुप भटनागर, उपाध्यक्ष विमल सक्सेना, विधि सल्लागार विकास कुमार पाठक आदी उपस्थित होते. यावेळी दीपक कपूर आणि कंपनीचे अध्यक्ष सुमित नंदा यांनी करारावर स्वाक्षरी केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये उदंचन जलविद्युत प्रकल्प राबवण्यासाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असल्याने महाराष्ट्राला मोठा फायदा मिळणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने ऊर्जा ग्रीड स्थिर ठेवण्यासाठी उदंचन जलविद्युत प्रकल्प (पंप्ड स्टोरेज प्रोजेक्ट्स) धोरणालाही वेग देण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रीड स्थिरतेसाठी सुमारे १ लाख मेगावॅट क्षमतेची उदंचन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून महाराष्ट्रच नव्हे तर राष्ट्रीय वीज ग्रीडही स्थिर ठेवण्याची क्षमता निर्माण होईल.

महाराष्ट्र आता सौरऊर्जेच्या क्षेत्रात नवा इतिहास रचत आहे. राज्य सरकारने आशियातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प हाती घेतला असून, त्याद्वारे शेती क्षेत्रातील संपूर्ण ऊर्जेची गरज सौरऊर्जेकडे वळविण्याचा उपक्रम राबविला जाणार आहे. या प्रकल्पातून तब्बल 16 गिगावॅट इतकी सौरऊर्जा वितरित क्षमता निर्माण होणार आहे. या प्रकल्पामुळे शेतीसाठी लागणारा वीजपुरवठा सौरऊर्जेवर आधारित होणार असून, त्यामुळे पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

राज्यात विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये उदंचन जलविद्युत प्रकल्प राबवण्यासाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती असल्याने महाराष्ट्राला मोठा फायदा मिळणार आहे. या सौरऊर्जा आणि उदंचन जलविद्युत प्रकल्पांमुळे महाराष्ट्र हा देशातील अक्षय ऊर्जेच्या क्षेत्रात अग्रणी ठरणार असून, पर्यावरणस्नेही आणि शाश्वत ऊर्जानिर्मितीकडे राज्याची वाटचाल होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी प्रास्ताविकात आतापर्यंत 50 उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सामंजस्य करार झाले असून सर्व करार प्रत्यक्षात येण्यासाठी आवश्यक कार्यवाही जलदगतीने करण्यात येत असल्याचे सांगितले.51 प्रकल्पांद्वारे 70,315 मे.वॅ. वीज निर्मिती अपेक्षित असून त्यामुळे 3.83 लाख कोटी गुंतवणूक व 1,13,990 मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### प्रकल्पाची माहिती

- या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे २५०० एवढी रोजगार निर्मिती होणार.
- या प्रकल्पाची स्थापित विदयुत क्षमता १५०० मे. वॉ. आहे.
- योजनेसाठी प्रथम पाणीसाठ्याकरिता अंदाजे १९.२९ टीएमसी इतके पाणी आवश्यक असून प्रतिवर्षी पुर्नभरणासाठी ३.२४ टीएमसी पाणी आवश्यक आहे.
- उदंचन योजनांच्या पाण्यापोटी प्रथम भरणासाठी औद्योगिक दराने सुमारे १ ७६२.२१ कोटी व प्रतिवर्ष पुनर्भरणासाठी सुमारे ११२८.३२ कोटी महसूल मिळणे अपेक्षित आहे.

# ॲडव्होकेट असीम सरोदेंची सनद रद्द

## महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचा मोठा निर्णय

प्रतिनिधी
■ मुंबई

पुण्यातील सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲडव्होकेट असीम सरोदे यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने सोमवारी हा निर्णय घेतला. ॲडव्होकेट विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हे निर्देश दिलेले आहेत. असीम सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळे असीम सरोदे यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. असीम सरोदे हे सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुरु असलेल्या सुनावणीत सहभागी असणाऱ्या वकिलांपैकी एक आहेत. मात्र, आता त्यांची सनद रद्द झाल्याने त्यांना न्यायालयात युक्तिवाद करता येणार नाही. याबाबत ॲडव्होकेट असीम सरोदे यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.



माजी ॲडव्होकेट असीम सरोदेंनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या संदर्भात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती. त्यांच्या वक्तव्यांमुळे न्यायव्यवस्थेचा अपमान झाला आणि न्यायालयांविषयी अविश्वास निर्माण झाल्याची तक्रार एका तक्रारदाराने केली होती. असीम सरोदेंचे वक्तव्य अशोभनीय, गैरजबाबदार व बदनामीकारक असल्याचे नमूद करून बार कौन्सिलकडे याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारदाराने १९ मार्च २०२४ रोजी सरोदेंना लेखी माफी मागण्याची संधी दिली, पण त्यांनी ती नाकारली. त्यामुळे आता त्यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे.

ॲडव्होकेट विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने असीम सरोदे यांच्या भाषणाचे ट्रान्सक्रिप्ट आणि व्हिडिओ क्लिप पाहिल्या. व्हिडिओमध्ये असीम सरोदे स्पष्टपणे म्हणताना दिसत आहेत की, "राज्यपाल फालतू आहेत" व "न्यायालय सरकारच्या दबावाखाली आहे". अशा विधानांमुळे नागरिकांमध्ये न्यायालयाबद्दल अविश्वास निर्माण होतो. न्यायव्यवस्था आणि संविधानिक पदे यांचा आदर राखणे ही वकिलाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. वकील हा "Officer of the Court" असल्याने त्याने न्यायसंस्थेविषयी संयम आणि सन्मान राखला पाहिजे, असे बार कौन्सिलच्या समितीने म्हटले.असीम सरोदे यांनी एका जाहीर कार्यक्रमात न्यायव्यवस्थेविषयी टिप्पणी केली होती. त्यांनी म्हटले होते की, न्यायव्यवस्था सरकारच्या दबावाखाली आहे व निकाल सरकारच्या बाजूने दिले जातात. तसेच त्यांनी राज्यपालांचा "फालतू" असा शब्द वापरून उल्लेख केला होता.

### माझे वक्तव्य हे लोकशाहीतील रचनात्मक टीका -सरोदे

मी कोणत्याही प्रकारे न्यायालयाचा किंवा संविधानिक पदांचा अपमान केलेला नाही. माझे वक्तव्य हे लोकशाहीतील रचनात्मक टीका होती. "फालतू" हा शब्द मी अपमानार्थ नव्हे, तर सर्वसामान्य भाषेत वापरला. मला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. माझा हेतू न्यायव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करण्याचा नव्हता, तर लोकांना जागरूक करण्याचा होता, असे स्पष्टीकरण असीम सरोदे यांनी दिले होते.

# टाटा ट्रस्ट्सविरोधात मेहली मिस्त्री लढणार कायदेशीर लढाई

प्रतिनिधी
■ मुंबई

रतन टाटा यांचे विश्वासू सहकारी अशी ओळख असणारे मेहली मिस्त्री यांना टाटा ट्रस्ट्समधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. पुनर्नियुक्ती नाकारल्याने त्यांनी मुंबई धर्मादाय आयुक्तांसमोर 'कॅव्हेट ' दाखल केला आहे. आता टाटा ट्रस्ट्सच्या मंडळाच्या रचनेत कोणताही बदल मंजूर होण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकले जावे, याची खात्री करण्यासाठी त्यांनी हे पाउल उचलले असल्याचे वृत्त एका इंग्लिश नियातकालिकाने दिले आहे.

मेहली मिस्त्री यांची 'टाटा ट्रस्ट्स'च्या बोर्डावर ऑक्टोबर २०२२ मध्ये नियुक्ती झाली होती. टाटा ट्रस्टच्या बहुतांश विश्वस्तांनी त्यांच्या पुनर्नियुक्तीविरोधात मतदान केले. २३ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकात, नोएल टाटा, उपाध्यक्ष वेणू श्रीनिवासन आणि विजय सिंग यांनी त्यांच्या पदावर राहण्यास विरोध केला. तीन विश्वस्तांनी त्यांच्या पुनर्नियुक्तीला पाठिंबा दिला, तर






जिमी टाटा गैरहजर राहिले. त्यामुळे मेहली मिस्त्री यांना सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्ट या दोन्ही बोर्डांवरून पायउतार व्हावे लागले. या दोन्ही ट्रस्टचा टाटा सन्समधील हिस्सा तब्बल ६६% आहे. नेहमीच पडद्याआड राहून मोठी भूमिका बजावणारे मेहली मिस्त्री हे टाटा ट्रस्टमधून बाहेर पडणे हे टाटा समूहाच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम' नुसार, ट्रस्टला त्यांच्या बोर्डातील कोणताही बदल ९० दिवसांच्या आत धर्मादाय आयुक्तांना कळवणे बंधनकारक आहे. ट्रस्टने अद्याप बोर्ड बदलाचा अहवाल दाखल केलेला नाही, म्हणजेच मिस्त्री यांनी प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच आपली बाजू मांडण्याची संधी मिळावी यासाठी हे पाऊल उचलले आहे. मेहली मिस्त्री यांनी दाखल केलेल्या 'केव्हीएट'मुळे आता धर्मादाय आयुक्तांसमोर सुनावणी निश्चित झाली आहे.

# महाराष्ट्रातील भारतीय चिकित्सा पद्धतीच्या आयुर्वेद, युनानी डॉक्टरांसाठी निरंतर वैद्यकीय अभ्यास कार्यक्रम

## डॉ. हेमंत अडसूळ यांनी मानले मुख्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे आभार

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय चिकित्सा पद्धती आयोग (NCISM) यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र भारतीय चिकित्सा परिषद (MCIM) ने महाराष्ट्रातील भारतीय चिकित्सा पद्धतीच्या आयुर्वेद व युनानी डॉक्टरांसाठी"निरंतर वैद्यकीय अभ्यास""continuos Medical Education " हा महत्वाचा कार्यक्रम सुरू करायचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी हा कार्यक्रम सुरू करण्यात पुढाकार घेतला.

या कार्यक्रमात प्रत्येक डॉक्टरला 5 वर्षात 50 पॉईट घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन रिन्यू करताना कौन्सिल कडे पॉईंट्स जमा झाले पाहिजेत.पॉईंट्स घेणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. पैकी 30 पॉईंट्स online MCIM मान्यताप्राप्त संस्थेकडून आणि 20 points off line घ्यायचे आहेत. या निर्णयाबद्दल महाराष्ट्र आयुष practioners असोसिएशन संघटनेचे सचिव डॉ. हेमंत अडसूळ यांनी मुख्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचे अभिनंदन करत आभार मानले आहेत.

या उपक्रमामुळे भारतीय चिकित्सा पद्धतीच्या डॉक्टरांचे ज्ञान अद्ययावत होणार आहे. महाराष्ट्रामधील डॉक्टरांना आयुर्वेद, यूनानी सहआधुनिक् चिकित्सा पद्धती अवलम्बण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनाने दिलेला आहे. त्यामुळेच आयुर्वेदासह आधुनिक चिकित्सेतील अध्ययावत ज्ञान शहर व खेड्या पाड्यात प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांना मिळत राहिल . ते डॉक्टर उत्तम वैद्यकीय सेवा देऊ शकतील. हा अत्यंत चांगला उपक्रम राबवीत असलेले परिषदेचे प्रशासक डॉ रमण घुंगराळकर व डॉ दिलीप वांगे प्रबंधक यांचे डॉ. हेमंत अडसूळ यांनी आभार मानले आहेत.

# महानगरपालिका निवडणुकीत विधानसभा निवडणुकीप्रमाणे मतदान केंद्रे कायम ठेवा !

## आमदार पराग शाह यांची निवडणूक आयोगाकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

महानगर पालिका निवडणुकीत विधानसभा निवडणुकी प्रमाणे मतदान केंद्रे कायम ठेवावे. अशी मागणी घाटकोपर पूर्व चे आमदार पराग शाह यांनी केली आहे. महानगरपालिका निवडणुकीमध्ये मतदारांचा वेळ वाचावा तसेच घराजवळच मतदान केंद्र असल्यास मतदारांना सुविधा होऊ शकते.

मुंबईतील नागरिकांचा मतदानाचा हक्क सुलभ आणि सुलभतेने पार पाडता यावा, यासाठी निवडणूक आयोग व महानगरपालिकेकडून सातत्याने सकारात्मक प्रयत्न होत आहेत. त्या अनुषंगाने, विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान मोठ्या गृहनिर्माण संकुलांमध्ये (हाउसिंग सोसायट्या) आणि जास्त मतदारसंख्या असलेल्या इमारतींच्या परिसरात नवीन मतदान केंद्रे सुरु करण्यात आली होती. पूर्वीच्या निवडणुकांमध्ये मतदान केंद्रे प्रामुख्याने महापालिका शाळा, राज्य शासनाच्या शाळा, बालवाडी, समाजकल्याण केंद्र आदी ठिकाणीच असत. त्यामुळे जेष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, दिव्यांग मतदार तसेच सर्वसामान्य मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचणे काहीवेळा अवघड जात असे. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत नव्या पद्धतीने गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे स्थापन केल्याने नागरिकांना मोठी सुविधा मिळाली आणि मतदानाची टक्केवारीतही लक्षणीय वाढ झाली.

उदाहरणार्थ, घाटकोपर (पूर्व) विधानसभा क्षेत्रात २०२४च्या लोकसभा निवडणुकीत एकूण ४० मतदान केंद्रे होती. परंतु विधानसभा निवडणुकीत नव्या मतदान केंद्रांच्या स्थापनेमुळे ही संख्या ६८ पर्यंत वाढली. यामुळे नागरिकांना सुलभतेने मतदान करता आले आणि मतदानाचा प्रतिसादही अधिक उत्साहवर्धक होता. मात्र सध्या अशी माहिती मिळत आहे की येत्या सार्वत्रिक बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पुन्हा जुन्या पद्धतीनेच मतदान केंद्रे ठेवण्याचा विचार केला जात आहे. यामुळे मतदारांना पुन्हा जुन्या अडचणींना सामोरे जावे लागेल आणि मतदान टक्केवारीत घट होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर, माझी विनंती आहे की २०२४ च्या विधानसभा निवडणुकीप्रमाणेच संपूर्ण मुंबईत पूर्वीप्रमाणेच मोठ्या गृहसंकुलांमध्ये व जास्त मतदारसंख्या असलेल्या सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे कायम ठेवावीत. यामुळे नागरिकांना मतदान करणे सोयीचे ठरेल तसेच लोकशाही प्रक्रियेत अधिकाधिक नागरिकांचा सहभाग वाढेल.

# पहिल्या टप्प्यात नगरपालिकांच्याच निवडणुका'; तीन टप्पे होणार

## बुधवारी निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद

प्रतिनिधी
■ मुंबई

नगरपालिकांच्या प्रभागांचे, नगराध्यक्षांचे आरक्षण जाहीर झाले. आता मतदार यादी देखील अंतिम झाली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील २८९ नगरपालिका, नगरपरिषदा-नगरपंचायतींच्याच निवडणुका घेण्याचे निश्चित झाले आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सायंकाळी किंवा बुधवारी दुपारी राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद नियोजित आहे. त्यादिवसापासून आचारसंहिता लागेल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

राज्यातील २८९ नगरपालिका, ३२ जिल्हा परिषदा, ३३१ पंचायत समित्या आणि २९ महापालिकांची निवडणूक होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुदत संपलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेतल्या जाणार आहेत. नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची तयार झाली आहे. तर महापालिकेच्या प्रभाग व महापौरांचे आरक्षणही या महिन्यात जाहीर होईल. ५ नोव्हेंबर रोजी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तीन टप्प्यातील निवडणुकांसाठी ८५ दिवस मिळणार आहेत. नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम २१ ते २५ दिवसांचा असणार आहे. दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि तिसऱ्या टप्प्यात महापालिकांच्या निवडणुका होतील, असे नियोजन आयोगाचे आहे. राज्यातील नऊ कोटींहून अधिक मतदार या निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क बजावतील, असेही सूत्रांनी सांगितले.

### निवडणुकीचे संभाव्य तीन टप्पे असे

२८९ नगरपालिका,२१ दिवसांचा निवडणूक कार्यक्रम, ३२ जिल्हा परिषदा व ३३१ पंचायत समित्या ३० ते ३५ दिवसांचा निवडणूक कार्यक्रम, २९ महापालिका २५ ते ३० दिवसांचा निवडणूक कार्यक्रम.

### सरकारी कार्यालयात निधी खर्चाची घाई

पहिल्या टप्प्यात नगरपालिका, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि शेवटी महापालिकांची निवडणूक होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या निवडणुका आयोगाला पुढील वर्षी ३१ जानेवारीपूर्वी घ्यायच्या आहेत. त्यामुळे पुढील किमान तीन महिने आचारसंहिता लागू असणार आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषदा, महापालिका, नगरपालिकांसह महसूल, जिल्हा नियोजन अधिकारी, अशा सर्वच कार्यालयांची सध्या निधी खर्चाची लगबग पहायला मिळत आहे. त्यातून दोन-तीन दिवसांत अंदाजे १५ ते २० हजार कोटींची कामे मार्गी लागू शकतात, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

# वाहनाच्या धडकेत सोनेरी कोल्हा जखमी; राष्ट्रीय उद्यानात उपचार सुरू

**मुंबई:** दोन दिवसापूर्वी मीरा-भाईंदर परिसरात भरधाव वेगात धावणाऱ्या वाहनाने एका सोनेरी कोल्ह्याला धडक दिल्याचे उघडकीस आले आहे. या अपघातात कोल्हा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन दिवसांपूर्वी मीरा-भाईंदर परिसरातील रस्त्यावर एक जखमी कोल्हा आढळला होता. जखमी कोल्ह्याल्या भरधाव वेगात आलेल्या वाहनाने धडक दिल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच 'एसएआरआरपी' या स्वयंसेवी संस्थेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी कोल्ह्याला राष्ट्रीय उद्यानातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. कोल्ह्याला रुग्णालयात आणले तेव्हा तो बेशुद्ध होता. तसेच त्याच्या मानेवर मोठ्या प्रमाणात जखमा आढळल्याचे राष्ट्रीय उद्यानाच्या पशुवैद्यक डॉ. विनया जंगले यांनी सांगितले. 'एसएआरआरपी'च्या पथकाने दाखवलेली तत्परता, तसेच राष्ट्रीय उद्यानातील रुग्णालयात वेळीच झालेले उपचार यामुळे कोल्ह्याला जीवदान मिळाले. रुग्णालयात कोल्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

**पुणे महानगरपालिका, पुणे**

जाहिरात क्र. २/१०९३
दि. ०३/११/२०२५

मोटार वाहन विभाग पुणे महानगरपालिका, कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय, ४२७, इंडस्ट्रिअल एरिया, गुलटेकडी, गुलटेकडी ३७ - पुणे, फोन नं ०२/२५५०६००१-०२०.

जावक क्र. :- मोवावि/ ३०८२ दिनांक:- ०३/११/२०२५

**शुद्धिपत्रक**

विषय : मोटार वाहन विभागाकडील निविदा क्र. PMC/VEHICLE / 2025 / 151 मध्ये प्रसिद्ध केलेल्या जाहिराती बाबत

विषयांकित निविदे मध्ये प्रसिद्धी करण्यात आलेल्या जाहिरात मध्ये जाहिरात विक्री कालवधी मध्ये दुरुस्ती करण्यात येत आहे.

तरी, टेंडर विक्री कालावधी खाली नमूद केल्या प्रमाणे गृहीत धरण्यात यावी.

टेंडर विक्री कालावधी : दिनांक : १५ / १० / २०२५ ते १० / ११ / २०२५ दु. २:३० पर्यंत
टेंडर स्विकृती कालावधी : दिनांक : १५/१०/२०२५ ते १०/११/२०२५ दु. २:३० पर्यंत
टेंडर उघडणे कालावधी : दिनांक : ११ /११ / २०२५ दु. ३:३० पर्यंत

सही/-
कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका

जावक क्र. : मावजसंका /१४०१
दिनांक : ०३/११/२०२५

**NEXT MEDIAWORKS LIMITED**

नोंदणीकृत कार्यालय : युनिट ७०१ए, ७वा मजला, टॉवर-२, इंडियाबुल्स फायनान्स सेंटर, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन रोड, मुंबई - ४०००१३,
ई-मेल: investor.communication@radioone.in संकेतस्थळ : www.nextmediawoks.com
सीआयएन : एल२२१००एमएच१९८१पीएलसी०२४०५२ दूरध्वनी: +९१-२२-४४१० ४१०४

सप्टेंबर ३०, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्धवर्षासाठी लेखापरीक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचा अहवाल

(प्रती सम भाग माहिती वगळता आयएनआर लाखांमध्ये)

| तपशिल | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले सहा महिने | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | सप्टेंबर ३०, २०२५ | जून ३०, २०२५ | सप्टेंबर ३०, २०२४ | सप्टेंबर ३०, २०२५ | सप्टेंबर ३०, २०२४ | मार्च ३१, २०२५ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून महसूल | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अपवादात्मक बाबी आणि कर पूर्व तोटा | (११५) | (११७) | (१३१) | (२३२) | (२६२) | (४८८) |
| अपवादात्मक बाबी कर पूर्व तोटा | (११५) | (११७) | (१३१) | (२३२) | (२६२) | ३९४ |
| कालावधीसाठी अनियंत्रित व्याजापश्चात तोटा (अपवादात्मक बाबीनंतर) | (११५) | (११७) | (१३१) | (२३२) | (२६२) | ३९४ |
| एकूण व्यापक उत्पन्न /(तोटा) | (५३०) | (११७) | (१३१) | (६४७) | (२६२) | ३२४ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य – आयएनआर १०/- प्रती समभाग) | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ | ६,६८९ |
| लेखा परीक्षित ताळेबंदानुसार राखीव महसूल वळगता अन्य भाग धारणा | | | | | | (९,१८८) |
| प्रती समभाग तोटा (आयएनआर १०/- प्रत्येकीचे) | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | वार्षिकीकरण केलेले नाही | |
| मूळ आणि सौम्यीकृत | (०.१८) | (०.१७) | (०.१९) | (०.३५) | (०.३९) | (०.५९) |

टिप: सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायारमेंटस) नियमावली, २०१५ ("सेबी एलओडीआर") च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजमध्ये सादर करण्याचा उपरोक्त हा त्रैमासिक वित्तिय निष्कर्षाचा तपशिलवार आराखडा आहे.

www.nseindia.com www.bseindia.com www.nextmediaworks.com

टिपा:
१. सप्टेंबर ३०, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षासाठीच्या उपरोक्त एकत्रिकृत वित्तिय निष्कर्षाचे समीक्षण करण्यात आले आहे आणि लेखा परीक्षण समितीद्वारे शिफारस करण्यात आली आहे आणि संचालक मंडळाच्या त्यांच्या संबधित नोव्हेंबर ३, २०२५ रोजी झालेल्या सभेमध्ये नोंदपटावर घेण्यात आले. संवैधानिक लेखापरीक्षक समुहाने उपरोक्त निष्कर्षाचे सेबी एलओडीआर च्या नियमावली ३३ अनुषंगाने परीक्षण करण्यात आले आणि कोणताही बदल नसलेला अहवाल जारी केला.
२. कंपनी (भारतीय लेखा मानांकन) नियमावली सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या भारतीय लेखां मानांकनाच्या अनुषंगाने एकत्रिकृत वित्तिय निष्कर्ष तयार करण्यात आले आहेत.
३. `इंड एएस ११०` अनुसार एकत्रिकृत आर्थिक निवेदन फेब्रुवारी ७, २०२५ अनुसार करण्याचे बंधन कंपनीला नाही.

संचालक मंडळाच्या करिता आणि वतीने

ठिकाण: नवी दिल्ली
दिनांक: नोव्हेंबर ३, २०२५

समीर सिंग
अध्यक्ष, डीआयएन:
०८१३८४६५